क्रमांक: एलबीएस १८८९/३७९/[४४५१]/अ-२,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक फेब्रुवारी, १९९१.

28 FEB 1991 151

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
मुंबई महानगर प्रादेशिक प्राधिकरण
कार्यालय, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे [पूर्व],
मुंबई -४०००५१.

विषय:- भूसंपादन - मुंबई उपनगर जिल्हा.
स.नं. ३२८, नगर भूमापन क्रमांक ४०९४,
मौजे कोलेकल्याण येथील मुंबई विद्यापीठा-
करिता संपादित करण्यात आलेल्या जमिनीपैकी
५००० चौ.मी. जमीन बस स्थानकासाठी
"बेस्ट" उपक्रमास भाडेपट्टयाने देण्याबाबत...

संदर्भ:- १] आपले पत्र क्रमांक १६/३ अ/डी-१९४/९०,
दिनांक १७/७/१९९०.
२] आपले पत्र क्रमांक सी/कार्या-९/भूसं/ कावि-
५/९१, दिनांक १३/२/१९९१.

आपल्या संदर्भाधीन पत्रास अनुलक्षून कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठास त्यांच्या युनिव्हर्सिटी कॅम्पससाठी संपादित करुन दिलेल्या मौजे कोलेकल्याण येथील जमिनीपैकी स.नं. ३२८, न.भू. क्र. ४०९४ मधील ५,००० चौ.मी. एवढी जमीन "बेस्ट" उपक्रमास बस स्थानकासाठी रु. १/- प्रति माह एवढ्या नाममात्र भाड्याने ५० वर्षांच्या भाडेपट्टयाने देण्यास शासन [आपणास] योग्य वाटतील अशा शर्ती व अटींवर तसेच पुढील अतिरिक्त अटींवर मंजुरी [देत] आहे.

१] भाडेपट्टयाने देण्यात आलेली जमीन ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात येईल. त्याच प्रयोजनासाठी वापरण्यात यावी.

२] भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीच्या प्रयोजनात कोणत्याही प्रकारे बदल करावयाचा झाल्यास अथवा जमीन पोटभाड्याने [ Sub let ] द्यावयाची असल्यास, त्यास शासनाची पूर्व मंजुरी आवश्यक राहिल.

कृ. मा. प.

8/3/91
8/3/91
8420
356/91

३] भाडेपट्ट्याचे नूतनीकरणास शासनाची मंजूरी आवश्यक राहील.

हे पत्र वित्त विभागाच्या सहमतीने, त्या विभागाकडील अनौपचारीक संदर्भ क्रमांक सीआर ७६६/९०/व्यय-९, दिनांक २५/१०/१९९० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

[ इ. म. ह. काझी. ]
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२] वित्त विभाग /व्यय-९.

Scanned by CamScanner

क्र १६ / ३ अ / १३-१८४

दि. ३० - ५ - ९१

-155-

वाचा - (१) मुंबई विद्यापिठाचे शासनाला लिहिलेले पत्र क्रमांक सीडीयू / ३४ / २०२ / ८८ दिनांक ८ २ ८८

(२) मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांचेकडील क्रमांक सीईसी / इस्टो / ३५६० / ७११ / ९० दिनांक १ - ६ - ९० चे पत्र

(३) या कार्यालयाचा अहवाल समक्रमांक दिनांक १७ - ७ - ९०

(४) शासन महसूल व वन विभाग पत्र क्रमांक एलएनडी १८८८ / ३०८ / (४४५११) / ज-२ दिनांक २८ - २ - ९१

आदेश

मुंबई विद्यापिठाचे पत्र दिनांक ८-२-८८ अन्वये विनंती केल्यानुसार त्यांच्या युनिव्हर्सिटी कॅम्पससाठी संपादीत करून दिलेल्या मौजे कोलेकल्याण येथील जमिनी पैकी स. नं. ३२८ व भू. क्र. ४०६४ मधील सोबतच्या नकाशात दर्शविलेली ५००० चौ. मी. एवढी जमीन "बेस्ट" उपक्रमास बस स्थानकासाठी रु. १:०० प्रतिवर्ष एवढ्या नाममात्र भाड्याने ५० वर्षाच्या भाडेपट्ट्याने देण्यास शासनाने खालील अटी व शर्तीवर मंजूरी दिलेली आहे

(१) भाडेपट्ट्याने देण्यात आलेली जमीन ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली आहे त्याच प्रयोजनासाठी वापरण्यात यावी.

(२) भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीच्या प्रयोजनात कोणत्याही प्रकारे बदल करावयाचा झाल्यास अथवा जमीन पोटभाड्याने (Sublet) द्यावयाची असल्यास त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील

(३) भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करण्यास शासनाची मंजूरी आवश्यक राहील

जमिनीचा ताबा मुंबई विद्यापिठाने / मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख

Scanned by CamScanner

तसेच नगर भूमापन अधिकारी क्र ३ म्युनिसिपल गॅरेज कम्पाऊंड एस. व्ही रोड, सांताक्रुझ, मुंबई ४०००५४ यांच्या मार्फतीने पाठवा

सही/- (...)
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा
२०/७/१९

प्रति

श्री जी एन ~~[illegible]~~ राजर्षि
रजिस्ट्रार
मुंबई विद्यापीठ
मुंबई ४०००३२

प्रत - इस्टेट ऑफिसर, मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम बेस्ट भवन बेस्ट मार्ग टपाल पेटी क्र १९२, मुंबई ४०००३० यांचेकडे माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना

प्रत - नगर भूमापन अधिकारी क्र ३ म्युनिसिपल गॅरेज कम्पाऊंड एस. व्ही रोड, सांताक्रुझ, मुंबई ४०००५४ यांना माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना

प्रत - जिल्हा भूमापन अधिकारी क्र. २ जुने जकात घर फोर्ट मुंबई - २३ यांचेकडे माहितीसाठी रवाना

प्रत - तहसिलदार, अंधेरी यांचेकडे माहितीसाठी रवाना.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा
२०/७/१९

Scanned by CamScanner

Lease
L-550
SR-79
Kolekalyan

-2239-

क्र. १६/३ डी/एल ५५०
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
बी.एम.आर.डी.ए. इमारत, ३रा मजला, वांद्रे [पूर्व]
मुंबई ४०० ०५१.

दिनांक - २०-१२-९३

वाचले क्र १. शासन महसूल व वन विभाग क्र. एलबीएल १८८९/३७९/[४४५१/अ-२ दिनांक २८.२.९१

२. या कार्यालयाकडील आदेश क्रमांक १६/ ३ अ/डी १२४ दिनांक ३०.५.९१

३. शासन महसूल व वन विभाग पत्र क्र. एलबीएल १८८९/३७९/[४४५१]/अ-२ दिनांक २८.९.९३

**आदेश**

मुंबई विद्यापिठास त्यांच्या युनिव्हर्सिटी कॅम्पसाठी संपादित करुन दिलेल्या मौजे कोलेकल्याण येथील जमिनीपैकी स.नं. ३३८, न.भू.क्र. ४०२४ मधील ५,००० चौ.मी. एवढी जमिन बेस्ट उपक्रमांस बस स्थानकासाठी रु. १/- प्रति माह एवढ्या नाममात्र भाड्याने ५० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास शासनाने उपरोल्लीखित उद्देशिकेतील क्र. १ कडील पत्रान्वये मंजुरी दिली आहे. तथापि सदर जमिन मुख्य कॅम्पसच्या विकास भागात येत असल्यामुळे इमारती बांधकामास व्का लागेची विद्यापिठा स आवश्यकता भासणार असल्यामुळे मंजूर जमिनी ऐवजी कॅम्पसच्या उत्तरेकडील हद्दी वरील स.नं. ३५४ मधील हि.नं. १, २ [भाग] व स.नं. ३७८ [भाग] मधील एकूण ३९४०.१३ चौ.मी एवढे क्षेत्र बेस्टला देण्याबाबत परवानगी मिळावी अशी रजिस्ट्रार मुंबई विद्यापिठ यांनी त्यांचे पत्र क्र. सीडीयू ३४/२४०८/९३अन्वये शासनास विनंती केली. शासनाने मुंबई विद्यापिठाची विनंती उद्देशिकेतील क्र.३ कडील पत्रान्वये शासन पत्र क्र. दिनांक २८.२.९१ च्या पत्रातील अटी व शर्तीवर मान्यकेली आहे. त्यानुसार वरील प्रमाणे ३९४०.१३ चौ.मी. जमिन बेस्ट ला देण्याची मुंबई विद्यापिठा स परवानगी देण्यात येत आहे. याबाबत उद्देशिकेत उल्लिखित क्र. २ कडील या कार्यालयाच्या दिनांक ३०-५-९१ च्या आदेशातील अटी व शर्ती कायम राहतील. जमिनीचा ताबा मुंबई विद्यापिठाने बेस्ट उपक्रम यांना जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३ म्युनिसिपल गॅरेज कंपाऊंड, एस.व्ही. रोड, सांताक्रुझ, मुंबई ४०० ०५४ यांच्या मदतीने द्यावा.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

प्रति,
कुल सचिव,
मुंबई विद्यापिठ, युनिव्हर्सिटी रोड,

Scanned by CamScanner

प्रतिलिपी-

१. अधिक्षक, [इस्टेट] मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, टपाल पेटी क्रमांक १९२ मुंबई४०० ०३९ यांचेकडे माहिती व जरूर त्या कारवाईकरिता रवाना.

२. नगर भूमापन अधिकारी, क्र. ३ म्युनिसिपल बॅरेज कंपाउंड, न. व्ही. रोड, सांताक्रुझ, मुंबई४०० ०५४ यांचेकडे उक्त जमिन दर्शविणा-या नकाशासह जमिनीचा ताबा देण्यासाठी रवाना.

३. विशेष भूसंपादन अधिकारी क्र. २ यांचेकडे रवाना.

४. तहसिलदार अंधेरी यांचेकडे माहितीसाठी रवाना.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

१८१२९३
पेंदकर

ISSUED

Date

Scanned by CamScanner